भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७५९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २१/११/२०१६

**१) घरातील दरवाजा तोडुन रोख रक्कम व सामानाची चोरी. :–**

दिनांक १९/११/२०१६ रोजी २०.०० वा ते २१.०० वा. दर. यातील फिर्यादी पुष्पाबाई नारायन हेडाऊ वय ५० वर्ष रा. कृष्णपुरा वार्ड भंडारा यांचे घरी कोणीही हजर नसतांना कोणीतरी अज्ञात चोराने कोणही नसल्याची संधी साधुन घराचे मागील दरवाजा तोडुन आत प्रवेश करून घराचे बेडरूम मधील लोंखंडी कपाटात असलेली पिवळी रेक्झीनची बॅग ज्यामध्ये रोख रक्कम ७३,०००/–रू. व दिवान वरील मायक्रोमॅक्स कंपनीचा मोबाईल कि. १,०००/रू– व कॅनरा बॅक चा एटीएम कार्ड असा एकुण ७४,०००/–रू. चा माल चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. मोरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहेत.

**२)लाकडी काठीने हातावर व पायावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २०/११/२०१६ रोजी ०६.०० वा. यातील फिर्यादी ही आपल्या मुलाबाळा सह आई कडे भोजापुर येथे राहत असतांनी यातील आरोपी हा लाकडी काठी घेऊन येवुन फिर्यादीचे मुलीस मारण्यास धावला असता फिर्यादीने तु मुलीला कशाला मारण्यास धावला असे हटकले असता आरोपीने काठीने फिर्यादीच्या डाव्या हातावर व पायावर मारून जखमी केले असे फिर्यादीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गि–हेपुंजे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) बांथरूमच्या बांधकामावरून कुऱ्हाडीने मारून जखमी केल्याने गुन्हा ;–**

दिनांक २०/११/२०१६ रोजी ०६.३० वा. दर. यातील जखमी फिर्यादी किशोर चोपराम बुरडे वय २६ वर्ष रा. ढोलसर हा व आरोपी क्र. २ यांचे संडास व बाथरूमचे बांधकामावरून वाद असुन यातील जखमीची वहीनी अंगनात सळा टाकीट असता आरोपी क्र. १ ने तिला मुझ्या बापाची जागा आहे का असे बोलुन हातातील डब्बा फेकला असता जखमी फिर्यादी हा मध्यस्थी बोलला आरोपी क्र. १,२,३ यांनी मिळुन जखमी सोबत लाबांझोबी केली व आरोपी क्र.१ ने आपल्या घरातील कुऱ्हाड आणुन जखमीच्या डोक्यावर मारून गंभीर जखमी केले असे फिर्यादी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३२६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) अवैध दारु अडयांवर धाडी . :–**

दिनांक २०/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा व लाखांदुर येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५० लिटर ५०० मिलीलीटर हातभट्टी दारू + नगदी +साहीत्य कि. ८,३३५/–रू. व ०८ लिटर १०० मिली लिटर देशीदारू कि. २२५०/–रु. असा एकुण कि. १०,५८५/–रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह) २१/११/१६
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत संगणक कक्ष भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता